# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेचे वेगळेपण

**डॉ. मृदुला निळकंठ रायपुरे**
सहाय्यक प्राध्यापक
डॉ. आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, चंद्रपूर
mrudulajanglekar@gmail.com
९९७५०३३०२७

**सारांश :—**

'हळुवार भावनांचा उद्रेक म्हणजे कविता' अशी कवितेची व्याख्या सुप्रसिद्ध कवी विलियम वर्डस्वर्थ यांनी केली. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेत हळूवार भावना अस्वस्थ करणाऱ्या आहेत. समाजाचे, संस्कृतीचे खरे रूप उघडे पाडणारी ही कविता आहे. श्रेष्ठ कवितेचे सर्वच निकष आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेत दिसून येतात. आईविषयीची भावना, अन्य व्यक्तींशी, समाजाशी असलेला सहसंबंध, सामाजिक घुसमटलेपण यांचे यथार्थ चित्रण त्यांच्या कवितेत ओतप्रोत भरलेले आहे. आंबेडकरवादी कवयित्रींची कविता दैववादाला झुगारून नव्या मानवतावादी समाजरचनेची आस धरणारी परिवर्तनवादी कविता आहे. पारंपरिक सीता—सावित्रीच्या प्रतिमांतून आपले दु:ख, अगतिकपण दाखवण्यापेक्षा रमाई—जिजाऊंच्या, सावित्रीबाईंच्या कार्य—कर्तृत्वाचे गुणगाण करणारी ही कविता आहे. नव्या युगातील आपली अस्मिता जपणारी, दाहक वास्तवाशी ओळख करून देणारी ही कविता आहे.

**प्रस्तावना :—**

आंबेडकरवादी साहित्याला ढोबळमानाने इ.स. १९६० पासून सुरूवात झाली असे आपण म्हणतो. प्रारंभी दलित साहित्य हे नाव घेऊन वाटचालीस सुरूवात झाली. पण दलित या शब्दाला जसा बहिष्कृतपणाचा गंध येतो, तसेच दलित साहित्याचेही झाले. म्हणून काही विचारवंतांनी त्याचे नामांतर करून 'आंबेडकरवादी साहित्य' हे नाव दिले. हे नवे नाव या साहित्याला अधिक संयुक्तिक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा अंगी बाणून आपण साहित्याची निर्मिती करत आहोत, असे या साहित्याने बिगुल वाजविले.

आंबेडकरवादी साहित्याची सुरूवात कवितेपासूनच झाली. प्रभावीपणे व प्रमुखत्वाने आंबेडकरवादी कविताच प्रथमत: पुढे आली. त्यांची खरी अभिव्यक्ती कवितेतून प्रकटली. म्हणूनच ''मराठी कवितेला हे एक मौल्यवान लेणेच लाभले आहे''[१], असे नारायण सुर्वे यांनी आंबेडकरवादी कवितेविषयी कौतुकाचे उद्‌गार काढले आहे. इतिहासाकडे पुन्हा एकदा डोकावून पाहिल्यानंतर असे दिसते की सर्व शोधांची जननी आदिमाता ही श्रध्देचे स्थान होती. मातृसत्ताक परंपरेत स्त्रीला मानाचे स्थान होते. पण इ.स. पूर्व ३२५० च्या सुमारास भारतात प्रवेश करणाऱ्या वैदिकांनी मातृसत्तेचा पार नायनाट करून टाकला. पूजनीय स्त्रीला भोगनीय स्त्री बनवून टाकले. तिची प्रतिमा डागाळवण्यासाठी नाना धर्मग्रंथांची निर्मिती केली. यासाठी अर्थातच भाषेचा व साहित्याचा आधार घेण्यात आला. स्त्रीला अगतिक आणि दलित बनवून टाकले. चातुर्वर्ण्याची निर्मिती केल्यानंतर सरसकट सर्व स्त्रिया शूद्र मानल्या गेल्या. अतिशूद्रांचा वर्णाबाहेरचा एक

वर्ण होता, ज्यातील समाविष्ट स्त्रियांच्या दु:खांनी परमोच्च बिंदू गाठले होते. तशाही स्थितीत त्यांनी साहित्याच्या माध्यमातून आपला हुंकार प्रकट केला. संत सोयराबाई, संत निर्मला, संत कान्होपात्रा, संत जनाबाई या संत कवयित्रींनी आपल्या अभंगांतून आपली अगतिकता, आपल्या वेदना प्रकट केल्या.

आधुनिक कालखंडातील ज्योती लांजेवार, हिरा बनसोडे, सुरेखा भगत, मल्लिका अमरशेख, मिना गजभिये, प्रज्ञा पवार, इत्यादी आंबेडकरवादी कवयित्रींनी आपापल्या अनुभवांच्या आधारे ज्या कविता रचल्या त्या उदात्त वेदनेचा हुंकार ठरल्या. ''खरी श्रेष्ठ कविता ती की जी माणसाच्या दु:खांशी, व्यथा—वेदनांशी जुळलेली असेल''[२] असा जर आपला दृष्टिकोन असेल तर त्या दृष्टिकोनातून आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता खऱ्या अर्थाने श्रेष्ठ ठरतात. या कवितेचे नाते दु:खाशी, व्यथा— वेदनांशी घट्ट जुळले आहे. गंमत अशी आहे की एवढे असूनही उद्याच्या आशावादी सूर्याची ते वाट पाहत आहे.

**आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेचे वेगळेपण :—**

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेत चिकित्साबुद्धी प्रकर्षाने जाणवते. याची परंपरा प्राचीन संत साहित्यात सापडते. संत सोयराबाई या संत चोखामेळा यांच्या पत्नी. अस्पृश्यतेचे चटके सहन करता करता त्यांनी अस्पृश्यतेचीच चिकित्सा केली. ती अशी,

'देहासी विटाळ म्हणति सकळ
आत्मा तो निर्मळ शुध्दबुध्द
देहीचा विटाळ देहीच जन्मला
सोवळा तो झाला कवण धर्म'

अस्पृश्य ठरवल्या गेलेल्या समाजातील एका कवयित्रीची ही तर्कबुद्धी पाहून मन थक्क झाल्याविना राहत नाही. एखाद्याची प्रगती रोखण्यासाठी कितीही काटे त्याच्या रस्त्यात पेरले तरी त्यातून वाट काढून प्रगतीपथावर जाणारे लोक महान ठरतात. महाराष्ट्राच्या मूळनिवासी महार जातीत जन्मलेल्या संत सोयराबाई यांनी आपल्या अभंगांतून सिद्ध केले की कुणी कितीही खाली खेचण्याचा प्रयत्न केला तरी जो मुळात वरचा आहे तो वरच राहणार ! अशा तऱ्हेने आंबेडकरवाद संत सोयराबाई यांच्या काळात वेगळ्या रूपाने नांदत होता.

हिरा बनसोडे या कवयित्रीने 'सखी' नावाच्या आपल्या कवितेतून आपली चिकित्साबुद्धी तर दाखवलीच पण त्या कवितेतून परमोच्च मानवतेच्या भावनेचा ओलावाही प्रकट केला आहे. भारतात मागाहून वास्तव्यास आलेल्या वैदिकांनी सर्व स्त्रियांना शूद्र गणून त्यांना अनेक अधिकारांपासून वंचित ठेवले. फक्त भारतीय संविधानानेच तिला माणुसकीचा आणि समानतेचा दर्जा दिला. संविधानाने स्त्रीला देशाचे सर्वोच्च स्थान प्रदान केले तर वैदिक धर्माने तिला मंदिराची साधी पायरीसुध्दा चढू दिली नाही. हे माहीत असूनही अनेक स्त्रिया या धर्माच्या गर्तेत स्वखुशीने गटांगळ्या खात आहेत, याहून मोठा फार्स कोणता असू शकेल !? आपल्यालाही शूद्रत्व मिळाले आहे याची जाणीव न ठेवता दुसऱ्या स्त्रीविषयी शूद्रत्व बाळगणाऱ्या एका स्त्रीला उद्देशून हिरा बनसोडे म्हणतात,

'सखी, तुझी परंपरा तू सोडली नाहीस
तर तिची घट्ट मुळे तुझ्या मनात रूजलेलीच आहेत
हेच त्रिवार सत्य आहे.'

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेचे वेगळेपण या वरील ओळींत दिसून येते. स्त्रीवादी दृष्टिकोन ठेवून स्त्रीहक्काचा डांगोरा पिटणाऱ्या स्त्रियाही अस्पृश्य, दलित स्त्रियांच्या दु:खांविषयी चकार बोलत नाहीत. हे झालं व्यवहाराविषयी. मात्र अभ्यासाच्या क्षेत्रात आजही ही अपेक्षा केली जाते की, ''दलित जाणीव आणि स्त्रीवादी जाणीव ही या युगातील महत्त्वाची जाणीव आहे. माणसाचा आत्मसन्मान हा त्या जाणिवेचा गाभा आहे पण त्या जाणिवेचे क्षितीज विश्वभान हे आहे.''[३] आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेत हे विश्वभान जपणारे माणूसपण आहे.

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता स्त्रियांना नटण्या–मुरडण्यात वेळ घालवायला सांगत नाही तर म्हणते,

'मुली, तुझे प्रसाधन आटप लवकर
पदर खोच कमरेला..... दारापुढे मोर्चा आहे.'

म्हणजे सतत अन्यायाविरूद्ध, विषमतेविरूद्ध आणि अमानवीय विचारधारेविरूद्ध लढा देत राहणे, संघर्ष करणे हे आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेचा गाभा आहे. एकूणच आंबेडकरवादी साहित्याचे वेगळेपण स्पष्ट करताना प्रा. रमेश पोळ म्हणतात, ''दलित साहित्यातील जीवन, अनुभवविश्व, जाणिवा, वैचारिकता, भाषा, अभिव्यक्ती हे समग्र मराठी साहित्यापेक्षा स्वतंत्र रूप घेऊन स्वत:चे वेगळेपण सिद्ध करते. त्यामुळे दलित साहित्याचे स्वरूप पारंपरिक भारतीय साहित्यापेक्षाही वेगळे झाले आहे. विषमतावादी समाजरचना प्रस्थापित अन्यायपूर्ण व्यवस्थेला उचलून धरणारी पारंपारिक साहित्याची 'ग्रंथसंपदा याविरूध्द न्यायाचे बंड' हेच दलित साहित्याचे मुख्य लक्षण आहे.''[४] प्रस्थापित समाज आणि आंबेडकरी समाज या दोहोंची चिकित्सा आंबेडकरवादी कविता करते.

प्रत्येक कालखंडात कवितेतील आशय, रूप, बंध यांत बदल होत असतात. ते सूक्ष्म रूपातील बदल कवितेच्या रूपाने प्रकट होतात, स्थूल होतात. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतही हे बदल जाणवतात. समाजाला नवे आत्मभान देण्याचे काम आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेने केले आहे. ''दलित कवितेने विविध स्तरीय उपेक्षित समाजगटांना अभिव्यक्तीच्या वाटा मोकळ्या करून दिल्या आहेत. त्यामुळे आत्मभान जागृत झालेला अनेक स्तरीय उपेक्षित समाज आज लिहिता झाला आहे.''[५] नव्या आत्मभानासोबत आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेने उपेक्षित समाजाला प्रेरणा दिली, जगण्याची आणि लिहिण्याची ! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नव पदवी धारण करणाऱ्या आपल्या समाजाला दिलेला संदेश आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेने घरोघरी पोहचविला. तिने चळवळीचे रूप धारण केले आहे.

आंबेडकरवादी कवयित्रींनी आपल्या बहुतेक कवितांत जे स्त्रीचित्रण केले आहे त्यात प्रेयसी, पत्नी या नात्यांहून अलग केवळ स्त्री म्हणून केले आहे. एक तर स्त्री म्हणून उपेक्षित; सोबत हर तऱ्हेने मागास असलेल्या गटातील म्हणून तिच्या वाट्याला दुप्पट उपेक्षितपणा येतो. सर्वसाधारण स्त्रियांपेक्षा तिच्या दु:खाचे स्वरूप निश्चितच वेगळे आहे. तिचा एकाकीपणा यशोधरेच्या रूपात प्रकट करताना हिरा बनसोडे म्हणतात,

'यशोधरे,
तू विरहाचे विष प्यालीस
राहुलला वाढवलेस, किती खस्ता खाल्ल्यास
आज,
विहारात पाहते मी तथागताला, बुध्दाला

तू आज कुठेच दिसत नाहीस'

स्त्रियांची ही मूल्यशून्यता कवयित्रीसोबत वाचकांनाही अस्वस्थ करते. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेचे हे वेगळेपण तिला उदात्ततेच्या पातळीवर नेते. या कवितेचे महत्त्व विषद करताना डॉ. भगवान ठाकूर म्हणतात, ''दलित कविता मी पासून आम्ही पर्यंत प्रवास करते.''[६] आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता अशा तऱ्हेने विश्व संचार करून मानवी मूल्यांची रूजवण करते.

**निष्कर्ष :—**

१. आंबेडकरवादी कवयित्रींची कविता चिकित्साबुध्दीने समाजाचे परीक्षण करते.
२. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेत विश्वभान जपणारे माणूसपण आहे.
३. भरकटलेल्या समाजाला आत्मभानाचे बळ देण्याचे काम आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता करतात.
४. संघर्षमूल्याची जाणीव आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतून प्रकट होते.
५. स्त्रियांची समाजात असणारी मूल्यशून्यता आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेत प्रकर्षाने जाणवते.

**संदर्भ सूची :—**

१. 'दलित काव्यदर्शन', संपा. नारायण सुर्वे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, तृ. आ. २००९, संपादकीय.
२. 'श्रेष्ठ कविता म्हणजे काय ?', संपा. डॉ. पुष्पलता मनोहर, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००५, पृ. १६.
३. 'स्त्रीवाद : साहित्य आणि संस्कृती', डॉ. अरूणा देशमुख, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, २०१०, पृ. १४.
४. 'दलित, ग्रामीण आणि प्रादेशिक सहित्य', संपा. डॉ. पवन मांडवकर, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र, यवतमाळ, प्र. आ. २०१४, पृ. २४—२५.
५. 'मराठी कवितेच्या नव्या दिशा', महेंद्र भवरे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, द्वि. आ. २०११, पृ. २००.
६. 'आंबेडकरी साहित्य : स्थिती आणि स्थित्यंतरे, डॉ. भगवान ठाकूर, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, २००९, पृ. १७५.